1178

1178
PRABHĀTA pherī karitāṃ bharīva ṭhośāñce gudde.
Bhāga 1 lā.
Mumbaī: Vāsudeva Vināyaka Dātāra, [1931?].
9 p. 16 cm.
Part 1 of a collection of nationalistic songs.
NAI 1345-47
PIB 72/19

NATIONAL ARCHIVES OF

P.1972 /17

प्रभात फेरी करितां

भरीव ठोशांचे गुद्दे.

VATAVAR (Vaibhav Vi...)

भाग १ ला.



सत्य विजय बुक डेपो

सुर्यमहाल नं. ८२ गिरगांव मुंबई नं. ४

किंमत आर्धा आणा.

NATIONAL ARCHIVES OF INDIA

चरखा चला चला के । लेंगे स्वराज्य लेंगे ॥ ध्रु० ॥

मलमल जो है विदेशी । आगे को न मिलेगा ॥

खादी नहि त्यजेंगे ॥ लेंगे० ॥ १ ॥

बहोत्तर करोड रुपिया । परदेश जा रहा है ॥

उसकू बचा बचाके । लेंगे० ॥ २ ॥

चरखेकि घणघणाट । रणभेरि या बजेंग ॥

अंग्रेज को सुनाके । लेंगे० ॥ ३ ॥

या हक्क है हमारा । तन मनसेंवि प्यारा ॥

मरणें नहीं डरेंगे । लेंगे० ॥ ४ ॥

हम सब परेड फौजी । कप्तान् हमारा गांधी ॥

आज्ञा उसीकि लेंगे । लेंगे० ॥ ५ ॥

तेहतीस करोड फौजी । रण साथ ए चलेंगे ॥

गांधी हुकुम करेंगे । लेंगे० ॥ ६ ॥

चरखा ही तोफ बनेंगे । तकवा बने है बरची ॥

गेलेसे सूत्रके हम । लेंगे० ॥ ७ ॥

NATIONAL ARCHIVES OF INDIA

गरीब ठोशाचे गुद्दे.

पद [चाल—मला मुंबईला जायचे]

॥ ई जत्रा होईल खळबळ ॥ तवाच जिरेल इंगा ॥धृ०॥

॥ गोरा सत्ता करी ॥ आपणा सर्वोवरी

॥ लागला घालाया धांगडधींगा ॥ १ ॥

॥ गोरा झाला राजा ॥ उडवीतो मौजा

॥ जुलमी कायद्याचा घाली हा पींगा ॥ २ ॥

॥ गरीब रयतेवर ॥ करी शीर जोर

॥ हानी मायंदाळा मांडलाया दंगा ॥ ३ ॥

॥ अशा सरकारची ॥ जुलमी ब्रिटीशाची

॥ खोड मोडाया नको कां सांगा ॥ ४ ॥

॥ एक विचारानें ॥ बहु चिकाटीनें

॥ नोकरशाहीचा जिरवूं नांगा ॥ ५ ॥

॥ सांगे शंकर कवी ॥ मिती सोडुन आधी ॥

॥ धावा हाकेसरशी जाळीम भुंगा ॥ ६ ॥

NATIONAL ARCHIVES OF INDIA

पद (चाल–हे प्रभो विभो)

॥ उठा चला तयार व्हा मरणाला

नामर्द असें का बनला ॥ धृ० ॥

॥ या भ्याडपणा सोडोनी ॥

॥ दाखवा बाणा मर्दानी ॥

॥ सांगतो ज्ञात जोडोनी ॥

आठवुनी महत्माजीला ॥ उठा चला तयार व्हा

मरणाला ॥ १ ॥

॥ या भारत भूमीवरती ॥

॥ भक्तभक्ते भेटती चरती ॥

॥ शिर जोर तुम्हांवर करिती ॥

तरी स्वस्थ कसें बसला ॥ उठा चला तयार व्हा

मरणाला ॥ २ ॥

॥ कधी शंकर मारवकर ॥

॥ म्हणे उठा आतां सत्वर ॥

॥ घेतली हातामधें शीर ॥

क्रूर सोंड देणाला ॥ उठा चला तयार व्हा

मरणाला ॥ ३ ॥

NATIONAL ARCHIVES OF INDIA

पद (चाल—थांब थांब थांब)

॥ देशामधली काढा घाण घाण घाण ॥ आतां ॥

देशामधली काढा घाण ॥ धृ० ॥

॥ राष्ट्रघातकी जे बनले ॥ रक्तेस ज्यांनीं छळियलें ॥
अशा दुष्टांचें उपटा कान कान कान ॥ आतां ॥

देशामधली काढा घाण ॥ १ ॥

॥ भा तभूमीवरती ज्यांनीं ॥ आजवरी केल्या चैनी ॥
तोची अपुला घेई प्राण प्राण प्राण ॥ आतां ॥

देशामधली काढा घाण ॥ २ ॥

॥ कवी शंकर जोडुनी हात ॥ बांधवास विनवी त्वरित ॥
राखा देशाचा तुम्ही मान मान मान ॥ आतां ॥

देशामधली काढा घाण ॥ ३ ॥

पद

॥ केली गोऱ्यांनीं चैन आजवरी ॥ आपल्या देशावरी ॥
सांगू किंतीतरी ॥ झाले पहा मग्रुर आपणावरी ॥ १ ॥
॥ ज्यांचें खाउनी अन्न त्यावरी ॥ बनले कारभारी ॥
प्रत्येकांवरी ॥ थयथय नाचती छातीवरी ॥ २ ॥

NATIONAL ARCHIVES OF INDIA

॥ करी जुलुम रयतेवरी ॥ दडपशाही करी ॥
बडे अधिकरी ॥ बहिष्कार घालू आवी यांच्यावरी॥२॥
॥ कवी शंकर सुचना करी ॥ ब्रिटीशांच्या उरी ॥
बसा खरोखरी ॥ हिंदुस्थाना बाहेर लावा सत्वरी ॥४॥

पद [सुखाचा शोध]

सतीची लाज राखाया ॥ नको का खादीमय काया ॥धृ०॥
बांगड्या वान हे सक्तीचें ॥ स्वदेशी व्यापारायाचें ॥
विनंति आपुल्या पाया ॥ नको का खादीमय काया ॥ १॥
विदेशी माल हा जाळा ॥ आज्ञा गांधिची पाळा ॥
गुलामी पाश तोडाया ॥ नको कां खादीमय काया ॥ २ ॥
आपुले दैन्य जाण्याला ॥ सुखाचें दिवस पाहण्याला ॥
शत्रुचा नांगा जिरवाया ॥ नको कां खादीमय काया ॥३॥
॥ विनंती शंकर कविची ॥ सांभाळा अब्रु देशाची ॥
शत्रुची खोड मोडाया ॥ नको कां खादीमय काया ॥ ४ ॥

पद [चाल—आनंद कंद]

॥ कसला समेट करितां ॥ कळूंद्या आम्हांस आतां ॥धृ०॥
येरवडा मंदिरांत
काय झालें नाही कळत
वाट पहात आहे जनता ॥ कळूंद्या आम्हांस आतां ॥ १ ॥

NATIONAL ARCHIVES OF INDIA

समेटात काय झोंलें
कोणी काय मान्य केलें ॥
जी काय झाली वार्ता ॥ कळुया आम्हांस आतां ॥ २ ॥
झाली मिटींग समाप्त ॥
मग टेबिली कां गुप्त ॥
का काळजींत पडता ॥ कळुया आम्हांस आतां ॥ ३ ॥
शंकरराव कविचें ॥
आहे सांगणे हिताचे ॥
तुम्हां हक्क काय देता ॥ कळुया आम्हांस आता ॥ ४ ॥

पद (चाल—आनंद कंद)

दारोदारी फिरून फिरवूं । घेऊं स्वराज्य घेऊं ॥ धृ० ॥
बनिया विलायतेचा ॥
यानें नाश केला आमुचा ॥
हद्दपार शांत देऊं ॥ घेऊं स्वराज । घेऊं ॥ १ ॥
खादीच वापरून ॥
संघशक्ती वाढवून ॥
मर्दानी बाणा दाऊं ॥ घेऊं स्वराज्य घेऊं ॥ २ ॥
व्यसनास देऊं फाटा ॥

मोहूं सैतानांचा साठा ॥
देशास्तव प्राण देउं ॥ घेउं स्वराज्य घेउं ॥ ३ ॥
शंकरराव कविचें ॥
हे सांगणें अखेरचे ॥
अलें तसेंच लावूं ॥ घेऊं स्वराज्य घेऊं ॥ ४ ॥

पद [चाल हरहर महादेव बोला]

सत्याग्रह करण्याला ॥ म्हा हो तयार मरण्याला ॥ धु० ॥
या वाचुनि हो सद्गति नाहीं आतां आपणाला ॥
बिजेई होऊं अथवा जाऊं लढून स्वर्गीला ॥ १ ॥
कंबर बांधा उठा चला हो रण संग्रामाला ॥
पुरे जाहली गोष आंतां ही काळ कठिण आला ॥ २ ॥
मलिमा हालुनी करूं मोकळे भारत भूमीला ॥
वास्तव मार्गे हट्ट नका हो प्राणही देण्याला ॥ ३ ॥
परदेशांतुनी जे या ठायीं आले चरण्याला ॥
त्यांना आपण शस्त्र न घेतां जाऊं शिरण्याला ॥ ४ ॥
बनिया म्हणुनी सुवर्णभूमी आला लुटण्याला ॥
तरी बंधुनो चला तयाची खोड मोडण्याला ॥ ॥५ ॥

ARCHIVES OF INDIA
NATIONAL

पूर्वज आपुले कधींच नाहीं म्हणे मरण ला ॥
तुम्हींच कां मग मिता सांगा गोळीबार ला ॥ ६ ॥
नका बंधुनो भिऊं तुरुंगामध्ये जाण्याला ॥
शंकर कवि म्हणे श्रीकृष्णाचा जन्मच तेथें झाला ॥ ७ ॥

पद (चाल—पोवाड्याची)

पारतंत्र्य या भारत भूमिला स्वतंत्र करण्याला ॥
देशोद्धारक वीर महात्मा गांधी अवतरला ॥ १ ॥
पशुसत्तेच्या भूतभीतिची करावया होळी ॥
देत असे हो वीर महात्म गांधी आरोळी ॥ २ ॥
लढत लाला लजपतराय हा देशाचा लाल ॥
स्वराज्यास्तव देउनी गेला प्राणाचे मोल ॥ ३ ॥
पंडित मोतीलाल नेहरू बॅरिस्टर श्रीमंत ॥
झटती देशासाठीं जनहो पहा सदोदित ॥ ४ ॥
मोतिलाल नेहरूचे चिरंजीव जवाहीरलाल ॥
गेले कारागृही करोनी शत्रुघर खाल ॥ ५ ॥
पटेल बंधू वीर सरीमन तसेच तय्यबजी ॥
जगदोद्धारासाठी झटती जिर हे रणगाजी ॥ ६ ॥
गांधी नेहरू लढले रणांगणी स्वातंत्र्यासाठी ॥
लढतां लढतां केलि शत्रुने त्यांना आडकाठी ॥ ७ ॥

देवि सरोजिनी कमलोदेवी चट्टोपाध्याय ॥
कस्तुरबाई लिलावतीचें पूजावेत पाय ॥ ८ ॥
धन्य धन्य या माता आतुल्या आहेत हो साऱ्या ॥
पुरुषां आधीं धैर्यवान या अरीस जिंकणाऱ्या ॥ ९ ॥
किती बंधुनो गाऊं मी या अबलांचे गूण ॥
केली त्यांनीं तुलांवरती पहा कशी ताण ॥ १० ॥
तरी बंधुनो कशी तुम्हांला ॥ गाढ झोंप आली ॥
उटा चला हो कांय पाहतां दीन भूमी झाली ॥११॥
शांतीमय रण संग्रामाला झाली सुरवात ॥
तरी चला हो राष्ट्रीय झेंडा घेउनी हातांत ॥ १२ ॥
जे वीर आपणासाठीं गेले तुरुंगवासांत ॥
चला सोडवू आपण त्यांना उठा उठा त्वरित ॥ १३॥
साखर झोपा पुरे जाहल्या तुमच्या त्या आतां ॥
जागे व्हा हो आतां तरी या स्वातंत्र्याकरितां ॥ १४ ॥
स्वदेशाची चाड खरोखर असेल हो ज्याला ॥
शंकर कवि म्हणे तोची होईल तयार मरण्याला॥१५॥

समाप्त.

NATIONAL ARCHIVES OF INDIA

पद

पद [चाल-मुखाचा शोध]

महात्मा वीर गांधिचा । ईशारा ऐका शौर्याचा ॥
उठा व्हा सावध आतां । किती हो झोप तुम्ही घेतां ॥
नव्हे हा काळ झोपण्याचा । ईशारा ऐका शौर्याचा ॥
पुरे ती जाहली शोप । घराची जाहली खोप ॥
आठवा बाणा पुर्वजांचा । ईशारा ऐका शौर्याचा ॥
बंधुनो बांधा कंबर । चला घ्या हातामध्यें शिरे ॥
करावा मोड शत्रुचा । ईशारा ऐका शौर्याचा ॥
देउं नका शेत सारा । आणि त्या अवघा । ॥
असे हा मार्ग विजयाचा । ईशारा ऐका शौर्याचा ॥
आपुल्या संघशक्तीनें । आणि ईशकृपेनें ॥
करूं या नाश गनीमांचा । ईशारा ऐका शौर्याचा ॥
असे ही वेळ शांतीची । नाहीं क्रांती करण्याची ॥
लढा हा बिन शस्त्राचा । ईशारा ऐका शौर्याचा ॥
सदा सत्य बोलावें । शत्रुशीं शांत वागावें ॥
करावा त्याग असत्याचा । ईशारा ऐका शौर्याचा ॥
मर्दानी बाणा आंगात । यावया कर मेहनत ॥
शिका तो खेळ लाठीचा । ईशारा ऐका शौर्याचा ॥
गिरवा शिक्षा पुढाऱ्यांचा । त्यांच्या स्वार्थत्यागाचा ॥
तुम्हाला अर्ज हा प्रेमाचा । ईशारा ऐका शौर्याचा ॥

NATIONAL ARCHIVES OF INDIA

विक्रीस तयार.

प्रभात–फेरी, नगर–फेरी, सायंफेरी, दारु, परदेशी कापड व रेल पिकेटींग, महात्मा गांधी, नाना फरारी, सोलापुर, सिंहगड, पोवाडा, प्रभात-संचार. तरुण भारत गितांजली, वगैरे सर्व प्रकारची स्वदेशी उपदेशपर पुस्तकें माफक दरानें मिळतील. क्याट-लाग मागवा व्यापाऱ्यास भरपूर कमिशन मिळेल.

पी. बी. पाठक आणि कंपनी,

महात्मा एजन्सी, सुर्यमहाल गिरगांव रेल्वे तिकीट व पार्सल ऑफीसचे वर मुंबई नंबर ४

प्रकाशक:–वासुदेव विनायक दातार मुंबई ४

प्रिंटर:–पी. बी. पाठक श्री पांडुरंग वैभव प्रेस, मुं. ४

NATIONAL ARCHIVES OF INDIA